अमृतमहोत्सवी

स्थापना १९३९

# पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

www.pudhari.com

पुणे

मंगळवार । १६ मे २०१७ । स्थापना वर्ष ७९ वे । आवृत्ती वर्ष १० । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध.

इंग्रजी शिका

मराठी बोलता येते ना मग इंग्रजी नक्कीच बोलाल ?

८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी खास सवलत

ELIXIR Education to Employment

## पंधरा रस्सा

### यू टर्न

अमेरिका ब्रिटनवर
सायबर हल्ला
कॅशलेस कशाला
खात्यावर डल्ला
दिलेला शब्दच
काल खरा होता
सहीचा निशाणी
अंगठाच बरा होता.

- रामदास फुटाणे

साईड इफेक्ट्स नाहीत!

धौती-योग

चूर्ण व टॅब्लेटस्

बद्धकोष्ठ आणि गॅसेस होतील आऊट!

आजच रात्री घ्या सकाळी OK!

# 'एटीएम'मध्ये सुधारणा करा

## सायबर हल्ल्याच्या धोक्याने रिझर्व्ह बँकेचे आदेश



- देशातील २,२०,००० जुने व्हर्जन असलेल्या एटीएमना धोका
- भारतावर फारसा परिणाम नाही : रवीशंकर प्रसाद

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देशातील सर्व बँकांना त्यांच्या एटीएमचे सॉफ्टवेअर सुधारित (अपग्रेड) करण्याचे आदेश दिले आहेत. 'वानाक्राय' या रॅन्समवेअरच्या हल्ल्याचा १५० पेक्षा जास्त देशांतील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रावर परिणाम झाला आहे.

या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या देशाच्या कॉम्प्युटर इमर्जन्सी




रिस्पॉन्स टीमने 'वानाक्राय'पासून बचावासाठीचे निर्देश दिले आहेत. या सर्व निर्देशांचे पालन करण्याचे आदेश रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देशातील सर्व बँकांना दिले आहेत.

जगभरातील विविध कंपन्या, रुग्णालये, सरकारी कार्यालये आणि बँका यांच्या संगणकावर या मालवेअरचा हल्ला झाला आहे. जगभरातील विविध बँकांतील माहिती तंत्रज्ञान यंत्रणेवरही या मालवेअरने हल्ला केला आहे. साहजिकच अशा बँकांची पैसे देवाण-घेवाणीची व्यवस्था ठप्प झाली आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने देशातील सर्व बँकांना त्यांच्या एटीएमचे सॉफ्टवेअर अपडेट करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

सविस्तर वृत्त / पान ७ वर

### काय आहे रॅन्समवेअर



# कुलभूषण
# व्हिडीओ ब

## आंतरराष्ट्रीय न्यायालयात फाटला पा

- भारताची बाजू भक्कम
- कथित व्हिडीओ पाहण्यास न्यायालयाचा स्पष्ट नकार
- आंतरराष्ट्रीय न्यायालयात भारताकडून युक्तिवाद

हेग/नवी दिल्ली : पीटीआय

भारताचे माजी नौदल अधिकारी कुलभूषण जाधव यांच्या प्रकरणी पाकिस्तानने केलेल्या कारस्थानाचा बुरखा भारताने आंतरराष्ट्रीय न्यायालयात फाडला. जाधव यांच्या फाशीच्या शिक्षेस कारणीभूत ठरलेला व्हिडीओ बनावट असल्याचे आंतरराष्ट्रीय न्यायालयात उघड झाले. जाधव यांच्या साक्षीसंदर्भातील कथित व्हिडीओ

